# महाराष्ट्र शासन

## राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC)

(प्रि. आय. ए. एस. ट्रेनिंग सेंटर)

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई -४०० ००१

Tel. No: 022 22070942 web: www.siac.org.in e-mail:siac1915@gmail.com

क्रमांक-एसआयएसी/२०२६-२७/मुख्य परिक्षा प्रशिक्षण/ ३६२ दिनांक-२९.०५.२०२६

**जाहिरात**

**नागरी सेवा मुख्य परीक्षा ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता प्रवेश**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी पूर्व परीक्षा-२०२६ दि.२४.०५.२०२६ रोजी पार पडली असून नागरी सेवा मुख्य परीक्षेकरिता जे उमेदवार पात्र आहेत, अशा उमेदवारांना नागरी सेवा मुख्य परीक्षेच्या ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता संस्थेत विनामुल्य प्रवेश देण्यात येत आहे. अशा उमेदवारांचे प्रशिक्षण नागरी सेवा मुख्य परीक्षेपर्यंत राहील. तरी संस्थेत प्रवेशासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरिता संस्थेच्या www.siac.org.in या संकेतस्थळावर सदर जाहिराती सोबत दिलेला अर्ज करावा.

**आपला प्रवेश अर्ज दि.२०.०६.२०२६ पर्यंत संस्थेच्या siac.cet2025@gmail.com या ई-मेल वर ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष या कार्यालयात अर्ज सादर करावा.**

**मुख्य परिक्षा २०२६ साठी पात्रताः-**

१. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याच्याकडे सक्षम अधिकाऱ्याने दिलेला महाराष्ट्राचे अधिवास दाखला (Domicile of Maharashtra Certificate) आवश्यक आहे.

२. उमेदवाराची केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेकरीता निवड झालेली असावी. निकालाची प्रत, रोल नंबर, पूर्व परिक्षेचे प्रवेश पत्र (Hall Ticket) प्रवेश घेताना सादर करणे आवश्यक आहे.

३. यापुर्वी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई SIAC संस्थेमध्ये प्रवेश घेतलेला नसावा.

४. प्रवेश मर्यादा क्षमता १०० + अल्पसंख्यांक १० = ११०

५. मुख्य परीक्षा-२०२६ करिता Quality Enhancement Programme २०२६ राबविण्यात येणार आहे.

**प्रवेशाच्यावेळी खालील कागदपत्रांची पूर्तता करुन आपला प्रवेश निश्चित करावा**

१. विद्यापीठ पदवी गुणपत्रिका / पदवी प्रमाणपत्र.

२. सक्षम अधिकाऱ्याने दिलेले महाराष्ट्र राज्य अधिवास प्रमाणपत्र.

३. शाळा सोडल्याचा दाखला

४. उत्पन्नाचा दाखला

५. जातीचा दाखला

६. जात वैधता प्रमाणपत्र

७. नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र

८. स्थायी निवास पुरावा - आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान कार्ड / शिधापत्रिका

९. वैद्यकीय प्रमाणपत्र (फिटनेस प्रमाणपत्र)

१०. स्वतःच्या नावे असलेल्या बँक खाते पासबुक ची छायांकित प्रत / धनादेश

११. संस्थेच्या नियमावली करारनामा / संमतीपत्र

१२. नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२६ चा निकाल जाहीर झाल्यानंतर आपले प्रवेश निश्चित होतील व त्यानंतर आपणांस विद्यावेतन अदा करण्यात येईल.

Patole

(डॉ.भावना पाटोळे,)

संचालक,

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई